विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त संस्था)
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे – ४११ ०३७.
Approved by A. I. C. T. E. New Delhi

Vishwakarma Institute of Technology
An Autonomous Institute Affiliated to Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
666, Upper Indiranagar, Bibwewadi, Pune - 411 037.
Identification No. - PU/PN/Engg./061/(1984)

नोटीस क्र. २९८     **नोटीस**     दि.०१/०३/२०२३

**महाडीबीटी पोर्टलवरून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता विविध योजनांकरिता (स्कॉलरशिप/फ्रिशीप/ईबीसी/डॉ. पंजाब देशमुख वसतिगृह भत्ता योजना/ अल्पसंखंक शिष्यवृत्ती/अपंग शिष्यवृत्ती इ.) ऑनलाईन अर्ज भरून सादर करणेबाबत.**

**(विद्यार्थ्यांनी अचूक ऑनलाईन अर्ज दि.३१ मार्च २०२३ या अंतिम तारखेपूर्वी भरून घ्यावा)**

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता राज्य शासनाने खालील नवीन महाडीबीटी पोर्टल सुरू केलेले असून ज्या ज्या विद्यार्थ्यांना (SC, ST, OBC, VJ, DT, NT, & SBC ) & Open/EBC) शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क तसेच एससी/एसटी करिता विकास निधी शुल्क माफ केलेले आहे अशा सर्व विद्यार्थ्यांनी **दि. ३१ मार्च २०२३ पूर्वी** आपले ऑनलाईन अर्ज **https://mahadbt.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावरून भरून ऑनलाईन अर्जाची प्रत व खालील नमूद कागदपत्रे जोडून महाविद्यालयात सादर करावी.

तसेच ज्या विद्यार्थ्यांनी काही कारणास्तव पूर्ण फी भरलेली आहे परंतू शासन नियमानुसार महाडीबीटी वरील योजनेच्या लाभाकरिता पात्र ठरत आहेत अथवा ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश संस्था स्तरावर (Institute Level) झालेले आहेत (उदा. SC, ST-Income limit 2.5 Lakhs only & OBC, VJ, DT, NT, & SBC-Income limit 1.5 Lakh only) परंतू जे राज्य/केंद्र शासनाच्या फक्त **स्कॉलशिप/शिष्यवृत्ती** योजनेसाठी पात्र ठरत आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांनी देखील वरील मुदतीत व संकेतस्थळावरून ऑनलाईन अर्ज भरून महाविद्यालयात सादर करावे.

ज्या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रवेश संस्था स्तरावर (Institute Level) झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांना ईबीसी सवलतीकरिता अर्ज भरू नयेत तसेच मागास प्रगर्वातील ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश संस्थास्तरावर स्तरावर (Institute Level) झालेले आहेत व ते वरील उत्पन्न मर्यादेत बसत नाहीत अशा विद्यार्थ्यांनीस महाडीबीटीवरून अर्ज भरू नयेत अशा सक्त सूचना या नोटीसव्दारे देण्यात येत आहे त्याची अंमलबजावणी विद्यार्थ्यांनी केली पाहिजे. शासनाच्या आदेशानुसार जे विद्यार्थी वरील मुदतीत महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाईन अंर्ज भरणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना राज्य / केंद्रशासनाच्या योजनेचा लाभ दिला जाणार नाही, या कारणास्तव महाविद्यालयाने ज्या-ज्या विद्यार्थ्यांनी फी माफ केलेली होती परंतू अशा विद्यार्थ्यांकडून वरील मुदतीत अर्ज भरले गेले नाहीत तर अशा सर्व विद्यार्थ्यांकडून शै. वर्ष २०२२-२३ या वर्षाची ची संपूर्ण फी खुल्या प्रवर्गाप्रमाणे भरून घेतली जाईल याची नोंद विद्यार्थ्यांनी घ्यावी तसेच याबाबत कोणाची, कसलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची देखील विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

## विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्यापूर्वी खालील सूचनाचे पालन करावे.

१) ऑनलाईन अर्ज भरताना सर्व मूळ कागदपत्रे (Original Documents) अपलोड करणे बंधनकारक आहे. जसे की, 1) Admission confirmation Letter i.e. Receipt cum acknowledgement of confirmation of Admission Letter, 2) Parent's Income Certificate 3) Caste Certificate, 4) Caste Validity, 5) Non creamy layer certificate (if. Applicable), 6) Leaving certificate, 7) 10th Marksheet, 8) 12th Marksheet, 9) Diploma Marksheet (If applicable) 10) FY/SY/TY B.Tech all sem. Marksheet (If applicable), 11) Family declaration regarding child beneficiaries, 12) Ration card, 13) Rent Agreement/ Hostel Certificate & Fee paid receipt 14) Father's Death Certificate / Divorce paper issued by Court (if applicable) 15) Aadhar Card & Aadhar Link proof, 16) GAP Affidavit (if applicable), 17) College Fee paid receipt 2022-23, 18) Disability Certificate for Disability Scholarship, 19) Marathi Family Beneficiary Declartion in govt. Format, 20) Ration card, 21) Other documents etc.

२) नव्याने प्रवेश घेतलेया प्रथम / थेट व्दितीय वर्ष २०२२-२३ च्या सर्व विद्यार्थ्यांना सन २०२१-२२ चे पालकांचे नावाचा मा. तहसिलदार यांनी मान्यता दिलेला उत्पन्न दाखला अपलोड करणे बंधनकारक राहील.

३) नुतनीकरणाचे विद्यार्थ्यांनी दोन्ही सत्राच्या ओरीजनल मार्कशीटची एकच पीडीएफ बनवून ती अपलोड करणे अनिवार्य राहील. ऑनलाईनवरील मार्कशीट अपलोड करू नये. विद्यार्थ्यांनी प्रोव्हिजनल मार्कशीट अपलोड अथवा conversion सर्टिफिकेट अपलोड करू नये.

बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त संस्था)
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७.
Approved by A. I. C. T. E. New Delhi

Bansilal Ramnath Agarwal Charitable Trust's
Vishwakarma Institute of Technology
An Autonomous Institute Affiliated to Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
666, Upper Indiranagar, Bibwewadi, Pune - 411 037.
Identification No. - PU/PN/Engg./061/(1984)



४) ईबीसीच्या सर्व विद्यार्थ्यांनी सन २०२१-२२ चे पालकांचे नावाचा मा. तहसिलदार यांनी मान्यता दिलेला उत्पन्न दाखला अपलोड करणे बंधनकारक राहील. वडिल हयात नसतील किंवा कौटुंबिक वाद असल्यासच आईचा उत्पन्न दाखला ग्राह्य धरला जाईल. तसेच पालक म्हणून आईचा उत्पन्न दाखला जोडला असल्यास वडिलाचा मृत्यु दाखला किंवा घटस्फोट असल्यास कोर्टाची कागदपत्रे उत्पन्न दाखल्यासोबत अपलोड करणे बंधनकारक राहील.

५) नुतनीकरणाच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रथम /थेट व्दितीय वर्षाच्या प्रवेशाच्या वेळी सादर केलेले उत्पन्न दाखला जोडावे.

६) विद्यार्थ्यांना शै. वर्ष २०२२-२३ या वर्षी प्रवेश घेतल्याबाबत फी पावती अपलोड करणे बंधनकारक राहील.

७) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरताना फी रक्कम रक्कम शून्य नमूद करावी परंतू जी काही फी भरलेली असेल ती फी पावती अपलोड करावी.

८) विद्यार्थ्याचे आधार कार्ड त्याचे बँकेशी लिंक/संलग्न असणे अतिशय आवश्यक आहे. विद्यार्थ्याचा आधार क्रमांक त्याचे बँक खात्याशी व NPCI शी लिंक असल्याशिवाय अर्ज भरू नयेत. विद्यार्थी आधार कार्ड बँक खात्याशी लिंक नसल्यास विद्यार्थ्याचे ज्या बँकेत खाते आहे त्या बँकेशी संपर्क साधून आधार संलग्न करून घ्यावे.

९) विद्यार्थ्यांचा अर्ज तपासणीनंतर पुन्हा विद्यार्थी लॉगीनवर आल्यास त्या कागदपत्रांची /त्रुटींची पूर्तता करून अर्ज पुन्हा महाविद्यालयाचे तपासणीकरिता ऑलनाईन सादर करणे बंधनकारक राहील, विद्यार्थ्यांनी तस न केल्यास होणाऱ्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.

१०) महाडीबीटीवर एका वेळेस एकाच योजनेला अर्ज करावा. परंतू विविध निर्वाहभत्ता जसे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वारधार योजना, डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना, पंडित दिनदयाळ स्वयंम योजना इत्यदी योजनेस पात्र असणाऱ्या लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही अट लागू राहणार नाही. विद्यार्थी निर्वाहभत्ता मिळणेसाठी पात्र असल्यास ऑनलाईन अर्ज मंजूर केला जाईल.

११) विद्यार्थ्यास /पालकांना ऑनलाईन अर्जाच्या योजनेबाबत काही अडचणी असल्यास त्वरीत महाविद्यालयाचे विद्यार्थी विभागाशी (स्कॉलरपिश काऊंटर नं.४ संपर्क साधावा.

B.R.A.C. TRUST Vishwakarma Institute of Technology विश्वकर्मा इन्स्टिट्यूट पुणे-३७.

(प्रो. डॉ. राजेश जालनेकर)
संचालक,
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे-३७
Director
Vishwakarma Institute of Technology
Pune-411 037.

प्रत:- १) सर्व विभाग प्रमुख यांना माहितीसाठी व विभागातील नोटीस बोर्डसाठी, २) महाविद्यालयातील सर्व नोटीस बोर्डकरिता- विद्यार्थ्यांच्या माहितीस्तव ३) सिस्टीम विभाग प्रमुख यांना महाविद्यालयाच्या संकेतस्थळावा अपलोड करणेकरिता.